**RNI No. MAHBIL /2009/31733**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

**वर्ष ५, अंक ८७]** **शुक्रवार, ऑगस्ट २, २०१९/श्रावण ११, शके १९४१** **[पृष्ठे १६, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक १९४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ ऑगस्ट २०१९

**अधिसूचना**

**केंद्रीय विद्युत प्राधिकरण (विद्युत पुरवठा व सुरक्षा संबंधी उपाययोजना) विनियम, २०१०.**

क्रमांक मुविनि-२०१९/प्र.क्र. ८५/ऊर्जा-५.—केंद्रीय विद्युत प्राधिकरण (विद्युत पुरवठा व सुरक्षा संबंधी उपाययोजना) विनियम, २०१० च्या विनियम २९ अनुसार, महाराष्ट्र शासन याद्वारे केंद्रीय विद्युत प्राधिकरण (विद्युत पुरवठा व सुरक्षा संबंधी उपाययोजना) विनियम, २०१० च्या विनियम २९ अन्वये शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१२३/ऊर्जा-५, दिनांक २ जानेवारी २०१७ रोजी निर्गमित, **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण क्र. ३, भाग ४-अ मध्ये दिनांक ३ जानेवारी २०१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या क्षमता प्रमाणपत्र देण्यासाठीच्या नियम व शर्ती मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

केंद्रीय विद्युत प्राधिकरण (विद्युत पुरवठा व सुरक्षा संबंधी उपाययोजना) विनियम, २०१० च्या विनियम २९ अन्वये क्षमता प्रमाणपत्र देण्याच्या नियम व शर्ती (यापुढे मुख्य नियम असे संबोधण्यात येईल) यात नियम १ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" १. **संक्षिप्त नाव.—** या नियमांना महाराष्ट्र विद्युत अनुज्ञापक मंडळ नियम, २०१७ असे संबोधण्यात येईल.

१अ. **अनुज्ञापक मंडळ.—** अनुज्ञापक मंडळ म्हणजे नियम-२ नुसार गठीत मंडळ.".

२. मुख्य नियमांच्या नियम ३ मधील,—

(क) खंड (क) ऐवजी खालीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

" (क) विद्युत निरीक्षकाने त्याच्या कार्यक्षेत्रातील दिलेल्या अनुज्ञप्ती व्यतिरिक्त विद्युत ठेकेदारांना अनुज्ञप्ती देणे ;";

(ख) खंड (ग) ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ग) विद्युत निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील " नमुना-ए " व " नमुना-बी १ " मध्ये अर्ज केलेल्या व क्षमता प्रमाणपत्र आणि परवाना दिलेल्या अर्जदारांव्यतिरिक्त उमेदवारांना विद्युत पर्यवेक्षक आणि तारतंत्री परवाना देणे ;";

**३.** मुख्य नियमांतील नियम ६ खंड (ख) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :–

" (ख) विद्युत निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिलेल्या अनुज्ञप्ती व्यतिरिक्त विद्युत ठेकेदारांना अनुज्ञप्ती देणे आणि विद्युत निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील " नमुना-ए " व " नमुना-ब १ " मध्ये अर्ज केलेल्या व क्षमता प्रमाणपत्र आणि परवाना दिलेल्या अर्जदारांव्यतिरीक्त उमेदवारांना विद्युत पर्यवेक्षक आणि तारतंत्री क्षमता प्रमाणपत्र व परवाना देणे ;".

४. मुख्य नियमातील नियम ८ यात,—

(क) खंड (ख) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

"(ख) विद्युत निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील " नमुना-बी १ " मध्ये अर्ज केलेल्या आणि प्रमाणपत्र व परवाना दिलेल्या अर्जदाराव्यतिरिक्त तारतंत्री यांना अनुज्ञापक मंडळाच्यावतीने प्रमाणपत्र व परवाना देणे ;";

(ख) खंड (ग) वगळण्यात येईल ;

(ग) खंड (घ) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

" (घ) संबधित जिल्ह्याच्या विद्युत निरीक्षकांमार्फत नवीन विद्युत ठेकेदार अनुज्ञप्तीसाठी सादर केलेल्या " नमुना-एन " मधील अर्जाची छाननी करणे व अनुज्ञापक मंडळास सादर करणे ;";

५. मुख्य नियमातील नियम ९ यात,—

(क) खंड (ख) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

"(ख) अधिक्षक अभियंता यांच्याकडून प्राप्त " नमुना-एन " मधील अर्ज केलेल्या अर्जदारांच्या विद्युत ठेकेदार परवान्यावर आणि लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्युत पर्यवेक्षकांच्या क्षमता प्रमाणपत्र व परवान्यावर आणि तारतंत्री यांच्या प्रमाणपत्र व परवान्यावर प्रती स्वाक्षरी करणे ;";

(ख) खंड (ग) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

"(ग) विद्युत ठेकेदारांच्या पत्त्यातील बदल, विद्युत पर्यवेक्षकांचा बदल, भागीदारीतील बदल याबाबत मंडळाने व विद्युत निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील विद्युत ठेकेदारांना दिलेले परवाने तसेच विद्युत पर्यवेक्षकांना दिलेले क्षमता प्रमाणपत्र व परवाना आणि विद्युत तारतंत्री यांना दिलेला परवाना याबाबत सर्व विद्युत पुरवठादार कंपन्या, सर्व अधिक्षक अभियंता, सर्व विद्युत निरीक्षक व विद्युत ठेकेदार संघटनेस कळविणे आणि कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे ;";

६. मुख्य नियमांतील नियम १० यात,—

(क) खंड (ख) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

" (ख) जेथे विद्युत ठेकेदार परवान्यासाठी अर्ज केलेली व्यक्ती स्वतः क्षमता प्रमाणपत्र व परवानाधारक विद्युत पर्यवेक्षक असल्यास त्याचा अर्ज स्वीकारणे, छाननी करून " नमुना-एल १ " मध्ये अनुज्ञापक मंडळाच्या वतीने परवाना देणे आणि जेथे विद्युत पर्यवेक्षक हा अर्जदाराकडे नोकरीला ठेवलेला असल्यास असे विद्युत ठेकेदार अनुज्ञप्तीसाठी आलेले अर्ज स्वीकारणे, छाननी करून संबधित अधिक्षक अभियंत्याकडे सादर करणे, नियम ९ च्या खंड (ग) च्या प्रयोजनासाठी परवाना दिलेल्या सर्व विद्युत ठेकेदारांची यादी अनुज्ञापक मंडळाला संबधित प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळाच्या अधिक्षक अभियंत्यामार्फत सादर करणे ;";

(ख) खंड (ग) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

" (ग) जी व्यक्ती किंवा संस्था स्वतः क्षमता प्रमाणपत्र व परवानाधारक विद्युत पर्यवेक्षक असेल अशा व्यक्तीने केलेले अर्ज स्विकारणे आणि त्यांची छाननी करून " नमुना-एल १ " मध्ये मंडळाच्या वतीने अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करणे आणि जेथे विद्युत पर्यवेक्षक हा अर्जदाराकडे नोकरीला ठेवलेला असल्यास असे विद्युत ठेकेदार अनुज्ञप्तीसाठी आलेले अर्ज पुढे पाठविणे ;";

(ग) खंड (घ) ऐवजी पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येईल :—

" (घ) आपल्या कार्यक्षेत्रातील विद्युत पर्यवेक्षक व तारतंत्री परीक्षेतील सुट व परिक्षेसाठी प्राप्त अर्ज स्विकारणे व त्यांची छाननी करणे,—

(*i*) आपल्या कार्यक्षेत्रातील " नमुना-ए " मधील विद्युत पर्यवेक्षकाबाबतच्या अर्जदारांना " नमुना-एफ १ " मध्ये क्षमता प्रमाणपत्र व " नमुना-एच १ " मध्ये परवाना देणे; आणि

(*ii*) आपल्या कार्यक्षेत्रातील " नमुना-बी १ " मधील विद्युत तारतंत्रीबाबतच्या अर्जदारांना " नमुना-आय " मध्ये क्षमता प्रमाणपत्र व " नमुना-जे " मध्ये परवाना देणे;

(*iii*) आणि आपल्या कार्यक्षेत्रातील " नमुना-सी " व " नमुना-डी " मधील अर्ज स्वीकारून व छाननी करून संबधित अधिक्षक अभियंत्यांना सादर करणे. नियम ९ च्या खंड (ग) च्या प्रयोजनासाठी परवाना दिलेल्या सर्व विद्युत ठेकेदारांची यादी अनुज्ञापक मंडळाला संबधित प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळाच्या अधिक्षक अभियंत्यामार्फत सादर करणे ;";

७. मुख्य नियमांतील नियम २२ ऐवजी पुढीलप्रमाणे नियम दाखल करण्यात येईल :—

" २२. **विद्युत पर्यवेक्षकास क्षमता प्रमाणपत्र आणि परवाना देणे.—** विद्युत पर्यवेक्षक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक उमेदवारास अनुज्ञापक मंडळाकडून " नमुना-जी " मध्ये विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र व " नमुना-एच " मध्ये परवाना देण्यात येईल आणि ज्या उमेदवारास परीक्षेमधून सुट देण्यात आलेली आहे त्यांना संबंधित कार्यक्षेत्राचे विद्युत निरीक्षक, विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र " नमुना-एफ १ " मध्ये व परवाना " नमुना-एच १ " मध्ये देतील ".

८. मुख्य नियमातील नियम २३ ऐवजी पुढीलप्रमाणे नियम दाखल करण्यात येईल :—

"२३. **विवक्षित प्रकरणात प्रमाणपत्रे आणि परवाने देणे.—** ज्यांना विद्युत तारतंत्री परीक्षेमधून सुट देण्यात आलेली आहे त्यांना संबंधित कार्यक्षेत्रातील विद्युत निरीक्षक, विद्युत तारतंत्री प्रमाणपत्र " नमुना-आय " मध्ये व परवाना " नमुना-जे " मध्ये देतील ".

९. मुख्य नियमांतील नियम २६ मध्ये " अधिक्षक अभियंता " या शब्दांऐवजी " विद्युत निरीक्षक " हे शब्द दाखल करण्यात येतील.

१०. मुख्य नियमांतील नियम २७ खालील परंतुकाऐवजी पुढीलप्रमाणे परंतुके दाखल करण्यात येतील :

" परंतु, एखादी व्यक्ती अथवा संस्था यांनी क्षमता प्रमाणपत्र व परवानाधारक विद्युत पर्यवेक्षक नोकरीला ठेवलेला आहे व त्या व्यक्ती अथवा संस्थेने अंगिकारलेली विद्युत कामे विद्युत पर्यवेक्षकाच्या पर्यवेक्षणाखाली पार पाडली जात असतील अशा प्रकरणात अनुज्ञापक मंडळ अनुज्ञप्ती देणे नाकारु शकेलः परंतु, आणखी असे की, ज्या व्यक्ती व संस्था स्वतः क्षमता प्रमाणपत्र व परवानाधारक विद्युत पर्यवेक्षक असल्यास अशा प्रकरणात विद्युत निरीक्षक कारणे नमूद करून अनुज्ञप्ती देणे नाकारु शकेल. अशा नकाराच्या पोचपावतीच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अर्जदार अनुज्ञापक मंडळाकडे अपील दाखल करू शकेल ".

११. मुख्य नियमांतील नियम २८ ऐवजी पुढीलप्रमाणे नियम दाखल करण्यात येईल :—

" २८. **विद्युत ठेकेदाराच्या अनुज्ञाप्तीचा नमुना.—** अनुज्ञापक मंडळ विद्युत ठेकेदाराला " नमुना-एल " मध्ये आणि विद्युत निरीक्षक विद्युत ठेकेदाराला " नमुना-एल १ " मध्ये अनुज्ञाप्ती देईल. ".

१२. मुख्य नियमांतील नियम ३८च्या उप नियम (१) ऐवजी पुढीलप्रमाणे दाखल करण्यात येईल :—

" (१) अनुज्ञापक मंडळाने दिलेल्या सर्व विद्युत ठेकेदार परवान्यांची नोंदवही सचिव, अनुज्ञापक मंडळ यांनी ठेवावी आणि विद्युत निरीक्षकांनी दिलेल्या विद्युत ठेकेदार परवान्यांची नोंदवही विद्युत निरीक्षकांनी ठेवावी.".

१३. मुख्य नियमांतील नियम ४० मधील " सचिवांची " या शब्दापुढे " किंवा विद्युत निरीक्षकांची " या शब्दांचा अंतर्भाव करण्यात येईल.

१४. मुख्य नियमांखालील " नमुना-एफ " नंतर पुढील नमुन्याचा अंतर्भाव करण्यात येईल :—

**" नमुना-एफ १**

(नियम २२ पहा)

महाराष्ट्र शासन

**विद्युत पर्यवेक्षकाचे क्षमता प्रमाणपत्र**

| अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकारातील रंगीत छायाचित्र |
|---|
| स्वाक्षरी |

श्री./कु./श्रीमती ........................................................................................ यांनी महाराष्ट्र विद्युत अनुज्ञापक मंडळ नियम, २०१७ अंतर्गत दि. ............. रोजीच्या अर्जाद्वारे विद्युत पर्यवेक्षकाच्या क्षमता प्रमाणपत्राकरिता " नमुना-ए " मध्ये या कार्यालयास अर्ज सादर केला आहे. विद्युत पर्यवेक्षकासाठी विहित केलेली परीक्षा देण्यापासून सूट मिळण्याकरिता पात्र होण्यासाठी लागणारी विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव अर्जदाराकडे आहे अशी खात्री पटली असून, याद्वारे क्षमता प्रमाणपत्र आणि लघु, मध्यम, उच्च व अति उच्च दाब या पातळीवरील कामाचे पर्यवेक्षण व विद्युत पर्यवेक्षकाचे काम करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन.

विद्युत निरीक्षक.

दिनांक :

ठिकाण :

कार्यालयाचा शिक्का. "

१५. मुख्य नियमाखालील " नमुना-एच " नंतर पुढील नमुन्याचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

**" नमुना-एच १**

(नियम २२ पहा)

(पुस्तक स्वरूपातील परवाना)

(१) प्रथम पृष्ठ : अर्जदाराचे छायाचित्र व स्वाक्षरी

(२) दुसरे पृष्ठ :

महाराष्ट्र शासन

**विद्युत पर्यवेक्षकाकरिता परवाना**

निर्गमित केल्याचा दिनांक :

नाव :

क्षमता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक :

जन्मदिनांक :

(३) तिसरे पृष्ठ :

हा परवाना, धारकास, महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या महाराष्ट्र विद्युत अनुज्ञापक मंडळ नियम, २०१७ मध्ये नमूद केलेल्या शर्तीस अधीन राहून सर्व विद्युत दाबाच्या स्तरावरील वीज संचमांडणीच्या कामावर पर्यवेक्षण करण्यास व ते पार पाडण्यास मुभा देत आहे. परंतु, धारकाकडे विद्युत ठेकेदार अनुज्ञप्ती नसेल तर त्यास विद्युत कंत्राटाचे काम हाती घेण्यास मुभा असणार नाही. हा परवाना, परवानाधारक व्यक्तीने नेहमी जवळ बाळगणे आवश्यक आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, विद्युत निरीक्षक.
महाराष्ट्र शासन.

दिनांक :

ठिकण : कार्यालयाचा शिक्का

(४) चौथे व पाचवे पृष्ठ :

अभिप्राय ................................ ."

१६. मुख्य नियमाखालील " नमुना-आय " ऐवजी पुढील नमुना दाखल करण्यात येत आहे.

| अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकारातील रंगीत छायाचित्र |
|---|
| स्वाक्षरी |

**" नमुना-आय**

(नियम २३ पहा)

महाराष्ट्र शासन

**तारतंत्री प्रमाणपत्र**

श्री/कु./श्रीमती ...................................................................................... यांनी महाराष्ट्र विद्युत अनुज्ञापक मंडळ नियम, २०१७ अंतर्गत दि. ............... रोजीच्या अर्जाद्वारे विद्युत तारतंत्री प्रमाणपत्राकरिता " नमुना-ब १ " मध्ये या कार्यालयास अर्ज सादर केला आहे. विद्युत तारतंत्रीसाठी विहित केलेली परीक्षा देण्यापासून सूट मिळण्याकरिता पात्र होण्यासाठी लागणारी विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव अर्जदाराकडे आहे अशी खात्री पटली असून, याद्वारे अर्जदारास तारतंत्री प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन.

विद्युत निरीक्षक.

दिनांक :

ठिकाण :

कार्यालयाचा शिक्का. "

१७. मुख्य नियमाखालील " नमुना-जे " ऐवजी पुढील नमुना दाखल करण्यात येत आहे.

**" नमुना-जे**

(नियम २३ पहा)

(पुस्तक स्वरुपातील परवाना)

(१) प्रथम पृष्ठ :- अर्जदाराचे छायाचित्र व स्वाक्षरी

(२) दूसरे पृष्ठ :-

महाराष्ट्र शासन

**तारतंत्री परवाना**

निर्गमित केल्याचा दिनांक :

नाव :

तारतंत्री परवाना क्रमांक व दिनांक :

जन्मदिनांक :

(३) तिसरे पृष्ठ :-

हा परवाना, धारकास महाराष्ट्र शासनाद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अनुज्ञापक मंडळ नियम, २०१७ मध्ये उल्लेख केलेल्या शर्तीच्या अधीन राहून केवळ तारेचे काम पार पाडण्यास मुभा देण्यात येत आहे. परंतु पर्यवेक्षण किंवा विद्युत विषयक कंत्राटाचे काम करण्यास मुभा देत नाही. हा परवाना, परवानाधारक व्यक्तीने नेहमी जवळ बाळगणे आवश्यक आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन.

विद्युत निरीक्षक

दिनांक :-

ठिकाण :-

कार्यालयाचा शिक्का

(४) चौथे व पाचवे पृष्ठ :-

अभिप्राय ................................ "

१८. मुख्य नियमाखालील " नमुना-एल " नंतर पुढील नमुन्याचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

| अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकारातील मालकाचे रंगीत छायाचित्र |
|---|
| स्वाक्षरी |

**" नमुना-एल**

(नियम २८ पहा)

महाराष्ट्र शासन

**विद्युत ठेकेदारांना अनुज्ञप्ती**

| अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकारातील पर्यवेक्षकाचे रंगीत छायाचित्र |
|---|
| स्वाक्षरी |

महाराष्ट्र शासनाद्वारे निर्गमित करण्यांत आलेल्या महाराष्ट्र विद्युत अनुज्ञापक मंडळ नियम, २०१७ मध्ये उल्लेख केलेल्या शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्युत दाबस्तरावरील विद्युत संचमांडणीची कामे पार पाडण्याकरिता श्री./कु./श्रीमती/मे. .............................. यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, विद्युत निरीक्षक
महाराष्ट्र शासन.

दिनांक :-

ठिकाण :-

कार्यालयाचा शिक्का

| नूतनीकरणाचा दिनांक | समाप्तीचा दिनांक | विद्युत निरीक्षकाची स्वाक्षरी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

| अ.क्र. | पर्यवेक्षकाचे नांव | पासून | पर्यंत | सही |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**टीप.—** जर वरील अनुज्ञप्तीचे त्याच्या समाप्तीच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत नूतनीकरण केले नाही तर, ती अनुज्ञप्ती रद्द समजण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रशांत पुं. बडगेरी,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 1st August 2019.

*NOTIFICATION*

Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2010.

No. CEI-2019/CR 85/Energy-5.— In pursuance of the regulation 29 of the Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2010, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the rules and conditions for issuing Certificate of Competency under regulation 29 of the Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2010, issued *vide* the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. Misc.2016/CR-123/Energy-5, dated 2nd January 2017 published in the *Maharashtra Government Gazette,* Extraordinary No. 3, Part IV-A, dated the 3rd January 2017, namely :—

1. For rule 1 of the Rules and Conditions for Issuing Certificate of Competency under regulation-29 of the Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2010 (hereinafter referred to as " the Principal Rules "), the following rules shall be substituted, namely :—

"1. *Short title*.— These rules shall be called the Maharashtra Electrical Licensing Board Rules, 2017.

1A. Licensing Board.- Licensing Board means the Board constituted under rule 2.".

2. In the rule 3 of the Principal Rules,—

(*a*) for clause (*a*), the following clause shall be substituted, namely :—

"(*a*) to grant license to the Electrical Contractors except those to whom the license shall be granted by the Electrical Inspector under his jurisdiction : '' ;

(*b*) for clause (*c*), the following clause shall be substituted, namely :—

"(*c*) to grant certificate of Competency and Permit to Supervisor and Certificate and Permit to Electrical Wiremen except those to whom the license shall be granted by the Electrical Inspector under his jurisdiction where the applications received by him in FORM- A and FORM-B1 ; " ;

3. In rule 6 of the Principal Rules for clause (*b*) the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) to grant license to Electrical Contractors except those to whom the license shall be granted by Electrical Inspector under his jurisdiction and to grant Certificate of Competency and Permit to Supervisor and Certificate and Permit to Electrical Wiremen except the ones granted by Electrical Inspector under his jurisdiction where the applications received by Electrical Inspector in FORM-A and FORM-B1 ; '' .

4. In rule 8 of the Principal Rules,—

(*a*) for clause (*b*), the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) grant Permit to Wireman on behalf of the Board except those to whom the license shall be granted by Electrical Inspector under his jurisdiction where the applications received by Electrical Inspector in FORM -B1 ; '' ;

(*b*) clause (*c*) shall be deleted ;

(*c*) for clause (*d*) the following clause shall be substituted, namely :—

"(*d*) scrutinise application of new Electrical Contractor license in FORM-N submitted through the concerned Electrical Inspector of the District and submit it to the Licensing Board ; " ;

5. In rule 9 of the Principal Rules,—

(*a*) for the clause (*b*), the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) to countersign the license to be given on behalf of the Board to the Electrical Contractor where application is submitted in FORM-N received from Superintending Engineer and to Electrical Supervisor and Wireman who are declared qualified in the examination conducted for issuing Certificate of Competency and Permit to Electrical Supervisor and Certificate and work Permit to Electrical Wiremen ; '' ;

(*b*) for the clause (*c*), the following clause shall be substituted, namely :—

''(*c*) to inform all the Electric Supply Companies, all Superintending Engineers and all Electrical Inspectors and Electrical Contractor Associations, of all licenses issued or change in address or change in Electrical Supervisors or change in Partnership, by the Board and publish the same on the official website including those Contractors' Licenses, Certificate of Competency and Permit issued to Electrical Supervisor and Certificate and Permit issued to Electrical Wiremen issued by the Electrical Inspector under his jurisdiction ; ''.

6. In the rule 10 of the Principal Rules,—

(*a*) for the clause (*b*), the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) to receive and scrutinise all applications under his jurisdiction for new Electrical Contractor licenses and grant licenses in FORM-L1 to those a person or a firm on behalf of Licensing Board who himself holds a Certificate of Competency and Permit of Electrical Supervisor and personally executes or supervises all work undertaken by him, and also to scrutinize and forward the applications to the Superintending Engineer, where the Electrical Supervisor is employed with the Applicant. The list of all licenses issued to Electrical Contractor by the Electrical Inspector under his jurisdiction shall be sent to Licensing Board through Superintending Engineer of respective Regional Electrical Inspection Circle for the purposes of clause (*c*) of rule 9 ; " ;

(*b*) for clause (*c*), the following clause shall be substituted, namely :—

"(*c*) to receive and scrutinise all the applications under his jurisdiction for renewal of Electrical Contractor Licenses and renew licenses on behalf of Licensing Board in FORM-L1 to those a person or a firm who himself is Electrical Supervisor, and, forward the applications where Electrical Supervisor is employed with applicant holding a certificate of Competency and Permit.".

(*c*) for clause (*d*), the following clause shall be substituted, namely :—

"(*d*) to receive and scrutinise all the applications under his jurisdiction for exemption as well as examination for the Electrical Supervisor and Wiremen and grant the Certificate,—

(*i*) in FORM-F1 and Permit in FORM-H1 to applicant in respect of Electrical Supervisor under his jurisdiction for applications received in FORM-A ; and

(*ii*) Certificate in FORM-I and Permit in FORM-J to Applicant in respect of Wiremen under his jurisdictions for applications received in FORM-B-1 ;

(*iii*) and submit all other application received in FORM-C and FORM-D to the Superintending Engineer after due scrutiny. The list of all certificates issued by Electrical Inspector shall be submitted to Licensing Board through Superintending Engineer of respective Regional Electrical Inspection Circle for the purposes of clause (*c*) of rule 9 ".

7. For rule 22 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

" 22. Grant of Certificate of Competency and Permit of Electrical Supervisor :—

Every candidate who passes the examination shall be granted a Certificate of Competency in FORM-G and Permit in FORM-H by the Board and Candidates exempted from appearing for the Electrical Supervisor's examination shall be granted Certificate of Competency in FORM-F1 and Permit in FORM-H1 by the Electrical Inspector of the respective Jurisdiction ".

8. for rule 23 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"23. Grant of certificate and permit in certain cases :—

Candidates exempted from appearing for the Wireman examination shall be granted Wiremen's Certificate in FORM-I and Permit for Wiremen in FORM-J by the Electrical Inspector of the respective Jurisdiction ".

9. In the Rule 26 of the Principal Rules, for the words " Superintending Engineer " the words " the Electrical Inspector " shall be substituted.

10. In rule 27 of the Principal Rules, for the existing proviso, the following provisos shall be substituted, namely :—

"Provided that in case of person or firm having a Supervisor under his employment holding a certificate of Competency and Permit under whose direct Supervision all electric works undertaken by him is being carried out, the Board may refuse to grant such license :

Provided further that, in case, a person or firm, where Electrical Supervisor License has been issued by the Electrical Inspector, then, the Electrical Inspector may refuse to grant such license citing reasons for refusal. On such refusal the applicant may make an appeal before the Board within sixty days from the date of receipt of such refusal.".

11. For the Rule 28 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"28. Form of Electrical Contractor License :—

The Board shall grant Electrical Contractor License in FORM-L and the Electrical Inspector shall grant an Electrical Contractor's License in FORM-L1.".

12. In sub-rule (*1*) of the rule 38 of the Principal Rules, the following shall be substituted, namely:—

"(*1*) A register of all licensed Electrical Contractors shall be maintained by the Secretary of the Board and by the Electrical Inspector for those Electrical Contractor's licenses issued by them in their respective offices''.

13. In rule 40 of the Principal Rules, after the word "Secretary" the words "or the Electrical Inspector as the case may be" shall be inserted.

14. After FORM-F appended to the Principal Rules, the following Form shall be inserted, namely :—

| |
|---|
| Recent Passport size colour Photograph |
| Signature |

**" FORM-F 1**

(*See* rule 22)

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Certificate of Competency**

Shri/Kum/Smt. ........................................................ has applied for Certificate of Competency to Electrical Supervisor in FORM-A under the Maharashtra Electrical Licensing Board Rules, 2017, *vide* application dated ............................. to this office. Having satisfied that the applicant is having prescribed qualification and experience to be eligible for exemption from examination for Electrical Supervisor, hence, the applicant hereby granted this Certificate of Competency and permitted to work as Electrical Supervisor and Supervise the works of Low / Medium / High and extra High Voltage Levels.

Industries, Energy and Labour Department, Government of Maharashtra.

Electrical Inspector.

Date :

Place :

Seal of the Office.".

15. After FORM-H appended to the Principal Rules, the following form shall be inserted, namely :—

**" FORM-H 1**

(*See* rule 22)

**(Permit in Book Form)**

(1) 1st Page – Photograph and Signature of Applicant

(2) 2nd Page

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Permit for Electrical Supervisor**

Date of Issue :-

Name :-

No. and Date of Certificate of Competency :-

Date of Birth :-

(3) 3rd Page -

This permit allows the holder to supervise and carry out electric installation work of all voltage levels subject to the conditions mentioned in the Maharashtra Electrical Licensing Board Rules, 2017, issued by the Government of Maharashtra, but does not allow him to undertake any electrical contracting works unless the Competency Certificate holder possess the Electrical Contractor's License.

This permit is to be carried with the holder's person at all times.

Electrical Inspector.

Date :

Place :

Seal of the Office

(4) 4th and 5th Page

Remarks.........................".

16. For FORM-I appended to the Principal rules, the following Form shall be substituted, namely :—

| |
|---|
| Recent Passport size colour Photograph |
| Signature |

**" FORM- I**

(*See* rule 23)

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Wiremen's Certificate**

Shri/Kum./Smt. .......................................................... has applied for Certificate of Electrical Wireman in FORM-B1 under the Maharashtra Electrical Licensing Board Rules, 2017, *vide* application dated ............................ to this office. Having satisfied that the applicant is having prescribed qualification and experience to be eligible for exemption from examination for Certificate of Electrical Wireman, hence, the applicant herby granted this Certificate of Electrical Wiremen.

Industries, Energy and Labour Department, Government of Maharashtra.

Electrical Inspector.

Date :

Place :

Seal of the Office.".

17. For FORM-J appended to the principal Rules, the following Form shall be substituted namely :—

**" FORM- J**

(*See* rule 23)

(1) 1st page : Photograph and signature

(2) 2nd page

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Permit For Wiremen**

Date of Issue :

Name :

No. and date of Wiremen certificate :

Date of Birth :

(3) 3rd page

This permit allows the holder to carry out wiring work only, subject to the conditions mentioned in the Maharashtra Electrical Licensing Board Rules, 2017, issued by the Government of Maharashtra, but does not allow him to undertake supervising or electrical contracting work.

This permit is to be carried with the holder's person at all times.

Industries, Energy and Labour Department, Government of Maharashtra.

Electrical Inspector.

Date :

Place :

Seal of the Office

(4) 4th and 5th Page-Remarks ..............................................".

18. After FORM-L appended to the principal rules, the following Form shall be inserted, namely :—

| Recent Passport size colour Owners Photograph |
|---|
| Signature |

**" FORM–L 1**

(*See* rule 28)

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**License to Electrical Contractor**

| Recent Passport size colour Supervisor's Photograph |
|---|
| Signature |

Shri./Kum./Smt./Messer's ............................................................. is/are hereby authorised to carry out electric installation work of all voltage levels in the Maharashtra State subject to the conditions mentioned in the Maharashtra Electrical Licensing Board Rules, 2017, issued by the Government of Maharashtra.

Industries, Energy and Labour Department, Government of Maharashtra.

Electrical Inspector.

Date :

Place :

Seal of the Office

| Date of Renewal | Date of Expiry | Electrical Inspector's Initial |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

| Sr. No. | Name of supervisor | From | To | Signature |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

*Note*.— If above license is not renewed within one month from date of expiry it shall be treated as cancelled.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRASHANT P. BADGERI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.